
शालेय प्रकल्पासाठी उपयुक्त

पुरेपूर माहिती व भरपूर छायाचित्रांसह

१

प्रकल्पातून ओळख

# महाराष्ट्रीयन संत



संपादक - प्रा. अनंत वा. वाईकर

एम.ए. (इति.), एम.ए. (राज्य.) एम.ए. (समाज.) बी.एड्, डी.एड्.

प्रकल्पातून ओळख

# आपले
# महाराष्ट्रीय संत




◆ संपादक ◆

**प्रा. अनंत वासुदेव वाईकर** (निवृत्त)

एम.ए.(इतिहास), एम.ए.(समाज.),
एम.ए.(राज्य.), बी. एड्., डी.एड्.
हरिभाई देवकरण प्रशाला, कनिष्ट महाविद्यालय, सोलापूर.

◆ लेखक ◆

**श्री. संजय शंकर देशपांडे**

एम.एस्सी, बी..एड.
वसंतराव देशमुख विद्याविकास प्रशाला, सोलापूर.


किंमत २५ रुपये


**सरस्वती बुक कंपनी**

अथर्वश्री बिल्डिंग, १२१ बुधवार पेठ, जोगेश्वरी मंदिरासमोर (पूर्व), श्रीमंत दगडूशेठ गणपती मंदिरामागे, पुणे-२.
फोन : २४४५१२१९/२४४७६८०९/२४४५४०८६

# अनुक्रमणिका

**महाराष्ट्रीय संत** — पृष्ठ क्र.

१. संत श्री ज्ञानेश्वर ........ ०३
२. संत श्री तुकाराम ........ ०५
३. संत श्री एकनाथ ........ ०७
४. संत श्री नामदेव ........ ०९
५. संत श्री रामदास ........ ११
६. संत श्री गोरा कुंभार ........ १३
७. संत जनाबाई ........ १९
८. संत कान्होपात्रा ........ २१
९. संत श्री रोहिदास ........ २३
१०. संत श्री दामाजीपंत ........ २४
११. संत श्री सेना महाराज ........ २५
१२. संत श्री नरहरी सोनार ........ २६
१३. संत श्री सावतामाळी ........ २७
१४. संत श्रीनिवृत्तिनाथ ........ २९
१५. भगवान श्रीमद् श्रीधरस्वामी ........ ३१

प्रकाशक / मुद्रक : श्री. योगेश र. कुंदूर
आदर्श विद्यार्थी प्रकाशन
अथर्वश्री बिल्डिंग, १२९ बुधवार पेठ, जोगेश्वरी मंदिरासमोर (पूर्व),
श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरामागे, पुणे-२.
फोन : २४४५१२१९/२४४७६८०९/२४४५४०८६

 आवृत्ती : २०१४

प्रिंटिंग विभाग : २६/५ नऱ्हे इंडस्ट्रियल, नऱ्हे-धायरी रोड,
पारी कंपनी जवळ, नऱ्हे, पुणे ४१.

प्रमुख विक्रेते : मे. सरस्वती बुक कंपनी
अथर्वश्री बिल्डिंग, १२९ बुधवार पेठ, जोगेश्वरी मंदिरासमोर (पूर्व),
श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरामागे, पुणे-२. फोन : २४४५१२१९/२४४७६८०९

मे. सरस्वती बुक डेपो
१८ नवी पेठ, सोलापूर ७. फोन : २६२६६३०

मे. कुंदूर बंधू पुस्तक भांडार
६३ नवी पेठ, सोलापूर ७. फोन : २६२६१५६



# १. संत श्री ज्ञानेश्वर

संत श्री ज्ञानेश्वर हे महाराष्ट्रातील महान संत.

**जन्मगाव :** आषगाव  श्रावण कृष्ण अष्टमी शके ११९७ (इ.स.१२७५)

समाधी : कार्तीक वद्य त्रयोदशी शके १२१८(इ.स.१२९६)

**परिचय :** संत श्री ज्ञानेश्वरांचा जन्म गोदावरी तीरावरच्या 'आपेगांवी' झाला. महाराष्ट्रामध्ये त्यांनी भागवत धर्माचा पाया घातला. निवृत्ती, सोपान व मुक्ताबाई ही त्यांची तीन भावंडे. त्यांचे वडील विठ्ठलपंत व आई रुक्मिणी हे दोघेही ईश्वरभक्त होते.

**धार्मिक कार्य व शिकवण :** वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी त्यांनी भगवद्गीतेवर 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ लिहिला. हिंदू धर्मातील बहुदेववाद, कर्मकांड इ. प्रवृत्तींना त्यांनी प्रखर विरोध केला. 'महाराष्ट्रीयन प्राकृत' भाषेतून त्यांनी ज्ञानेश्वरी लिहिली.

**सामाजिक कार्य :** संत श्री ज्ञानेश्वर हे पंढरपूरच्या विठ्ठलाचे परमभक्त होते. दरवर्षी ते पंढरपूरला जात असत. त्यांचे 'ज्ञानेश्वरी', 'चांगदेव पासष्टी', 'अभंगगाथा' व 'अमृतानुभव' हे चार ग्रंथ प्रसिद्ध आहेत. ज्ञानेश्वरांचे लोकप्रिय 'पसायदान' अजरामर ठरले.

**इतर कार्ये :** ज्ञानेश्वरांनी पैठणच्या धर्मपंडितांपुढे रेड्याच्या मुखातून वेद वदवून घेतले आणि ईश्वर सर्व ठिकाणी आहे, याची साक्ष पटवली. सर्वसामान्य लोकांना भक्तीची, मुक्तीची वाट दिसावी म्हणून त्यांनी हरिपाठाचे अठ्ठावीस अभंग लिहिले. त्यांनी आपल्या अभंग-ओव्यांतून प्रत्येकाच्या मनात श्रद्धा, भक्ती व बंधुभाव जागवण्याचे काम केले. मानव जातीच्या कल्याणासाठी त्यांनी परमेश्वराकडे पसायदान मागितले. त्यांच्या अंगी असलेल्या दया, प्रेम आणि करुणा यामुळे भक्तजन त्यांना 'माउली' म्हणतात. त्यांनी भारतभर तीर्थयात्रा करून इ. स. १२९६ मध्ये पुण्याजवळ 'आळंदी' येथे समाधी घेतली.







# २. संत श्री तुकाराम

महाराष्ट्रातील थोर संत म्हणून संत श्री तुकाराम यांना ओळखले जाते.

**जन्मगाव :** देहू **जन्म :** माघ शुध्द पंचमी शके १५३०

**वैकुंठगमन :** फाल्गुन वद्य व्दितीया शके १५७१ (इ.स.१६४९)

**परिचय :** पुण्याजवळ देहू येथे संत श्री तुकारामांचा जन्म झाला होता. त्यांचे पूर्ण नाव तुकाराम बोल्होबा अंबिले. त्यांच्या वडिलांचे नाव बोल्होबा. देहूगावात त्यांचे घर होते. थोडी जमीन होती. वाण्याचे दुकान होते. तुकावाणी म्हणूनच ते प्रसिद्ध होते, गावात दुष्काळ पडल्यानंतर त्यांचे दुकान, शेती-वाडी, घरदार सारे गेले. त्यानंतर

त्यांचे मन संसारात कधीच रमले नाही. लहानपणापासूनच त्यांना विठ्ठलभक्तीचा वारसा मिळाला होता. त्यातच ते रमू लागले. दरवर्षी ते पंढरीच्या वारीला जात असत. ते निस्सीम विठ्ठलभक्त होते.

**धार्मिक कार्य व शिकवण :** श्री तुकारामांच्या वाणीतून निघालेले रसाळ अभंग लोकांना आवडू लागले. त्यांनी समाजातील अनिष्ट प्रथा व रूढींना कडाडून विरोध केला. लोकांना दया, क्षमा व शांती यांची शिकवण दिली. श्री तुकाराम महाराजांच्या रसाळ अभंग रचना 'श्री तुकाराम गाथा' या ग्रंथात आहेत.

**सामाजिक कार्य :** श्री तुकारामांनी लोकजागृती, लोकशिक्षण, लोक-उद्धाराचे, समाज सुधारण्याचे कार्य केले. आपल्या कीर्तनातून समतेचा उपदेश केला.

**" जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ।**

**तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।।"**

हा संदेश त्यांनी लोकांच्या मनावर बिंबवला. श्री तुकारामांनी आपल्या कीर्तन-अभंगांद्वारे समाजातील विषमता, वाईट रूढी यांवर टीका केली. सर्वांना समजेल अशी शिकवण दिली. त्यांनी चालू केलेली पंढरीची वारी अजूनही चालू आहे. पुष्कळ लोक देहूहून पंढरपूरला चालत जातात.

**इतर कार्ये :** श्री तुकारामांची अभंग रचना जनमानसांत प्रिय आहे. त्या वेळी ब्रह्मवृंदांनी त्या रचना अमान्य केल्या आणि रामेश्वर भट्टांनी तर त्या रचना इंद्रायणी नदीत बुडविण्याची आज्ञा दिली. त्या आज्ञेचा आदर करून श्री तुकाराम महाराजांनी त्या रचना नदीत बुडवल्या; परंतु तेरा दिवसांनी श्रीविठ्ठलांच्या आज्ञेने त्या रचना इंद्रायणी नदीने जशाच्या तशा त्यांना परत केल्या. त्यामुळे त्यांचे श्रेष्ठत्व सिद्ध झाले. आजही संपूर्ण महाराष्ट्रात 'ग्यानबा तुकाराम' चा जयघोष ऐकू येतो. तुकोबांचे देहू हे गाव वारकरी सांप्रदायाचे श्रद्धास्थान आहे.

अशा या थोर संतांनी इ. स. १६४९ मध्ये वैकुंठाकडे प्रयाण केले.



# ३. संत श्री एकनाथ

संत एकनाथ हे महाराष्ट्रातील थोर संत म्हणून ओळखले जातात. आपल्या थोर कार्यांमुळे हे संत लहान-थोर सगळ्यांना परिचित आहेत.

**जन्मगाव :** पैठण **जन्म :** इ.स. १५३३

**मृत्यू :** फाल्गुन वद्य षष्टी इ.स.१५९९

**परिचय :** महाराष्ट्रातील पैठण या गावी संत एकनाथांचा जन्म झाला. वडिलांचे नाव सूर्यनारायण आणि आईचे नाव रुक्मिणी. त्यांनी महाराष्ट्रामध्ये भागवत धर्माचा प्रचार केला. भगवतभक्तीचा वारसा त्यांना त्यांच्या आई-वडिलांकडून मिळाला. संत एकनाथ हे कृष्णभक्त होते.

**धार्मिक कार्य :** संत श्री एकनाथांनी 'भागवत पुराण, भावार्थ रामायण आणि रुक्मिणी स्वयंवर' हे ग्रंथ लिहिले. त्यांनी रचलेली भारुडे प्रसिद्ध आहेत. आपल्या भारुडांतून अंधश्रद्धा व जुन्या चालीरीती यांवर त्यांनी टीका केली. अनेक ओव्या, अभंगदेखील लिहिले. बहुजन समाजाला समजेल अशा मराठी भाषेतून प्रचंड लिखाण केले.

**सामाजिक कार्य व शिकवण :** संत श्री एकनाथ यांना जातिभेद, उच्च-नीच अजिबात मान्य नव्हते. त्यांनी समाज प्रबोधनाचे, अंधश्रद्धा दूर करण्याचे कार्य केले. गुरूंच्या मार्गदर्शनाशिवाय भक्ताला देवापर्यंत जाता येत नाही, संसारात राहून देवभक्ती करता येते, हे त्यांनी लोकांना पटवून दिले. प्राणिमात्रांवर दया करा, श्रीमंत-गरीब हा भेदभाव करू नका, हेही त्यांनी आपल्या कृतीद्वारे लोकांना दाखवून दिले.

**इतर कार्ये :** संत श्री एकनाथ आपले गुरू जनार्दन स्वामी यांच्याकडे हिशोब ठेवण्याचे काम करत असताना रात्रभर जागून त्यांनी एक पैची चूक शोधून काढली. तहानलेल्या गाढवाला पाणी पाजले. वारंवार डंख मारणाऱ्या विंचवाला जीवदान देऊन प्राणिमात्रांवर दया करावी, हे कृतीतून पटवून दिले. भारुड, गौळण, पद्यरचना यांमधून त्यांनी जनतेला समता, बंधुता, ममता व प्रेम यांची शिकवण दिली. अज्ञान, अंधश्रद्धा, गैरसमजुती दूर करण्यासाठी त्यांनी केलेल्या भारुडांचा समाजाला मोठा उपयोग झाला. एकनाथ महाराजांना गुरूंबद्दल नितांत आदर होता. ते इ. स. १५९९ मध्ये स्वर्गवासी झाले.



# ४. संत श्री नामदेव

संत श्री नामदेव हे सर्वांना परिचित असणारे महाराष्ट्रातील थोर संत.
**जन्मगाव :** नरसी-बामणी (हिंगोली) **जन्म :** कार्तिक शुध्द एकादशी शके ११९२
**समाधी :** आषाढ वद्य त्रयोदशी, शके १२७२ (इ.स. १३५०)


**परिचय :** संत नामदेवांची आई बाणाई व वडील दामाशेठ हे दोघेही पांडुरंगाचे निस्सीम भक्त होते. आपल्या आई-वडिलांकडून त्यांना विठ्ठलभक्तीचा वारसा मिळाला. वयाच्या अकराव्या वर्षी त्यांचा 'राजाई' नावाच्या मुलीशी विवाह झाला. संसारात त्यांचे मन रमले नाही. विसोबा खेचर हे त्यांचे गुरू होते.

**धार्मिक कार्य व शिकवण :** प्रेम व भक्ती यांचा उपदेश त्यांनी केला. 'भक्ती'शिवाय देवापर्यंत पोहोचता येत नाही, संपूर्ण मानव-जातीला भक्तीचा अधिकार आहे, अशी शिकवण त्यांनी दिली.

त्यांचे अनुयायी महाराष्ट्र व पंजाबमध्ये आहेत. मूर्तिपूजा त्यांना अमान्य होती. उपवासाची गरज नाही, असे त्यांचे मत होते. मराठी व हिंदीमध्ये त्यांनी अभंग रचले आहेत.

**सामाजिक कार्य :** पंजाबमध्ये 'घुमान' या ठिकाणी त्यांचे विशाल स्मृतिमंदिर बांधले आहे. 'गुरू ग्रंथसाहिब' या शिखांच्या पवित्र ग्रंथामध्ये संत श्री नामदेवांची अनेक वचने समाविष्ट करण्यात आलेली आहेत. सर्व जातींना समान मानणारे श्री नामदेव हे महान संत होते. त्यांनी अनेक लोकांना भक्तिमार्गाला लावले व सर्वांभूती परमेश्वर आहे, हे समजावून सांगितले. त्यांनी सामाजिक विषमता दूर केली. उच्चनीच भेदाभेद मोडले. तसेच प्रत्येकाच्या मनात श्रद्धा, ऐक्य, मैत्री व सद्भावना जागृत केली. भारतभर भागवत धर्माचा प्रसार त्यांनी केला.

**इतर कार्ये :** त्यांनी अनेक हिंदी-मराठी काव्यरचनाही केल्या. पंढरपूरमध्ये 'नामदेवांची पायरी' आजही अखंड वंदनीय आहे. त्यांनी वयाच्या ऐंशिव्या वर्षी श्री विठ्ठलासमोरच्या पायरीवरच आपला देह ठेवला.





# ५. संत श्री रामदास

महाराष्ट्रातील थोर संत प्रभू रामचंद्रांचे दास म्हणून संत श्री रामदास आपणा सर्वांना परिचित आहेत.

**जन्मगाव :** जांब (औरंगाबाद) **जन्म :** शके १५३० (इ.स.१६०८)
**मृत्यू :** माघ वद्य नवमी शके १६०३(इ.स.१६८१)


**परिचय :** संत रामदासांचा जन्म गोदावरी नदीकाठच्या 'जांब' या गावी रामनवमीच्या दिवशी झाला. त्यांचे नाव नारायण असे होते. त्यांच्या वडिलांचे नाव सूर्याजीपंत आणि आईचे नाव राणूबाई. रामदास श्रीरामाचे भक्त होते. ते स्वतःला रामाचा दास म्हणू लागले. ते शेवटपर्यंत अविवाहित होते. संसारात राहून मुख्य ध्येय गाठता येत नाही, हे त्यांनी जाणले होते. त्यांनी कठोर तपश्चर्या केली.

**धार्मिक कार्ये :** श्री रामदासांनी श्रीराम व बलोपासनेसाठी हनुमानाची मंदिरे महाराष्ट्रात स्थापन केली. त्यांनी 'दासबोध' ग्रंथ व मनाचे श्लोक लिहिले. हिंदू समाजातील एकजुटीचे कार्य त्यांनी केले.

**सामाजिक कार्य व शिकवण :** श्री रामदासांनी लोकांना शक्तीची उपासना करण्यास शिकविले. संघटित होऊन अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्याची स्फूर्ती दिली. मनाच्या श्लोकातून सद्विचार व सद्वर्तनाची शिकवण दिली. 'दासबोध' या ग्रंथातून लोकांना मोलाचा संदेश दिला.

**इतर कार्ये :** संत श्री रामदासांनी टाकळी या गावी रामनामाचा तेरा कोटी जप केला. शिवाजी महाराजांना स्वराज्य-स्थापनेसाठी संत श्री रामदासांनी मोलाची मदत केली. लोकांच्या मनातील आत्मविश्वास जागा केला. धर्माबद्दल आदर निर्माण केला गेला. लोकांच्या मनात देवभक्ती तसेच देशभक्ती जागविली. शिवाजी महाराजांनी त्यांच्या उपदेशाचे पालन केले. शिवाजी महाराजांच्या मनावर त्यांचा फार मोठा प्रभाव होता.

स्वतः प्रपंचापासून दूर राहून, प्रापंचिकाने प्रपंचात, पारमार्थिकाने परमार्थात व्यावहारिकाने व्यवहारात कसे वागावे, कसे राहावे, काय करावे, काय करू नये, याचा बोध दासबोध या ग्रंथातून घेतला पाहिजे. त्यांनी आरत्या, अभंग, करुणाष्टके, श्लोक अशा रचना-देखील केल्या.



महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून, खेड्यापाड्यांतून 'जयजय रघुवीर समर्थ' ही गर्जना घुमविली. भारतभर भ्रमण करीत त्यांनी मनाच्या श्लोकाचा प्रसार केला. माघ वद्य नवमीला सज्जन-गडावर समाधी घेतली. तो दिवस 'दासनवमी' म्हणून साजरा केला जातो.



# ६. संत श्री गोरा कुंभार

गोरा कुंभार म्हणजे महाराष्ट्रातील थोर संत.

**जन्मगाव :** तेर-ढोकी (उस्मानाबाद) जन्म : शके ११८९(इ.स.१२६७)

**मृत्यू :** इ. स. १३१७


**परिचय :** संत श्री गोरा कुंभार यांचा जन्म उस्मानाबाद जिल्ह्यातील तेरढोकी या गावात झाला. त्यांचे मूळ नाव गोरोबा. त्यांना विठ्ठलभक्तीचा वारसा लहानपणापासून मिळालेला होता. मातीची भांडी, गाडगी, मडकी, रांजण, पणत्या बनवणे हा त्यांचा व्यवसाय होता. पंढरीचा पांडुरंग हे त्यांचे आराध्य दैवत होते.

**धार्मिक कार्य :** संत गोरा कुंभारांनी कीर्तने केली. त्यांची भजनेसुद्धा प्रसिद्ध आहेत. संतमुखी देवाचे नाव घेण्याची शिकवण त्यांनी दिली. भगवतभक्तीचा प्रसार केला.

**सामाजिक कार्य व शिकवण :** संत श्री गोरा कुंभार हे पंढरपूरच्या विठ्ठलाचे निस्सीम भक्त होते. उच्च-नीच असा भेदभाव करू नका, सर्वांना समानतेची वागणूक द्या, अशी शिकवण संत श्री गोरा कुंभार यांनी आपल्या आचरणातून समाजाला दिली. त्यांनी आपल्या कथा, प्रवचन, कीर्तन यांद्वारे समाज-प्रबोधनाचे कार्य केले. त्यांनी विठ्ठलभक्ती करा, असा संदेश दिला.

**इतर कार्ये :** संत श्री गोरा कुंभार आपल्या कामालाही विठ्ठलनामाची जोड देत असत. 'हाती काम, मुखी विठ्ठल नाम' घेता घेता त्यांचे देहभान हरपून जात असे. एकदा गाडगी, मडकी तयार करण्यासाठी चिखल तुडवीत असताना विठ्ठलाच्या अभंगात ते इतके रंगून गेले, की त्या चिखलात त्यांनी स्वतःच्या पोराला कधी तुडवले तेच त्यांना कळले नाही. एकदा नकळत पत्नीला स्पर्श केल्याने आपण विठ्ठलाची आण मोडली म्हणून गोरोबांनी आपले हात तोडून घेतले. तेव्हा असेच कीर्तन करत असताना प्रत्यक्ष विठ्ठलानेच येऊन त्यांना त्यांचे हात परत दिले. आणि त्यांच्या पत्नीला मूलही परत मिळाले, अशी आख्यायिका आहे.


संत श्री गोरा कुंभार अगदी उत्कंठतेने विठ्ठलभक्ती करीत. ज्ञानदेव, मुक्ताबाई यांनी नामदेवांची परीक्षा घेतली तेव्हा नामदेवांच्या डोक्यावर मारणारे आणि हे मडकं अजून कच्चं आहे, असा अभिप्राय देणारे हेच संत श्री गोरा कुंभार होत.






# आपले महाराष्ट्रीय संत






संत श्री ज्ञानेश्वर




संत श्री तुकाराम



संत श्री एकनाथ



संत श्री नामदेव



संत श्री रामदास



संत श्री गोरा कुंभार



संत जनाबाई






संत कान्होपात्रा



संत श्री रोहिदास



संत श्री दामाजीपंत



संत श्री सेना महाराज




संत श्री नरहरी सोनार



संत सावता माळी



संत श्रीनिवृत्तिनाथ



भगवान श्रीमद् श्रीधरस्वामी



# ७. संत जनाबाई

संत जनाबाई या महाराष्ट्रातील थोर स्त्री संत होत्या.

जन्म गाव : गंगाखेड (परभणी) मृत्यु : आषाढ वद्य त्रयोदशी शके १२७२ साल (इ.स. १३५०)

**परिचय :** एक महान संत कवयित्री, संत नामदेवांच्या दासी म्हणून ओळखल्या जातात. त्या संत नामदेवांच्या घरी दळण-कांडण करत. श्री पांडुरंगाच्या त्या निस्सीम भक्त होत्या.

**धार्मिक कार्य :** संत जनाबाईंचे नामदेव चरित्र, हरिश्चंद्र आख्यान, सेना न्हावी चरित्र, प्रल्हाद चरित्र, ज्ञानेश्वर स्तुती, कृष्णजन्म, बालक्रीडा व काला पदे अशा जवळ जवळ ३५० रचना व अभंग प्रसिद्ध आहेत. संत जनाबाईंच्या जात्यावरील ओव्याही प्रसिद्ध आहेत.

**सामाजिक कार्य व शिकवण :** स्त्रीच्या जीवनात दैनंदिन काम करताना ज्या अडचणी येतात, त्यांचे काव्यात्मक वर्णन संत जनाबाई यांनी आपल्या अभंगांतून केले आहे. दरवर्षी त्या पंढरपूरला जात असत. जातिभेद, सामाजिक विषमता, अंधश्रद्धा यांवर त्यांनी आपल्या ओव्यांमधून टीका केली आहे.


त्यांच्या मुखात सतत श्रीविठ्ठलाचे नामस्मरण चाली असे. संत जनाबाईंनी संत-सहवासाचे माहात्म्य मोठे आहे, असे म्हटले आहे. देवाला सर्व सारखेच असतात, अशी शिकवण त्यांनी समाजाला दिली.

**इतर कार्ये :** 'वैकुंठीचा हरी' या अभंगातील ओवीतून श्रीकृष्णांच्या लीलांचे सुंदर वर्णन त्या करतात. बाळाच्या नाजुकशा पायात पैंजणही आहेत व हातात वाळेही आहेत. हातामध्ये लोण्याचा गोळा आहे, असा प्रत्यक्ष हरी जिच्या घरी वाढतो आहे, अशी ती यशोदा माता धन्य होय. त्या मातेच्या चरणांवर मी नतमस्तक होते. अशा उत्कटतेने श्रीहरींबद्दल त्यांनी आपल्या ओवीतून प्रेम व्यक्त केले आहे.

संत जनाबाईंची विठ्ठलभक्ती अनन्य साधारण होती. प्रत्यक्ष विठ्ठल तिच्यासोबत दळण-कांडण करीत होते.

आपल्या प्रत्येक ओवी-अभंगांच्या शेवटी 'जनी म्हणे' असा उल्लेख संत जनाबाई करत.





# ८. संत कान्होपात्रा

महाराष्ट्रातील सर्वपरिचित असणारी थोर स्त्री संत कान्होपात्रा होय.

**जन्मगाव :** मंगळवेढा **जन्म :** इ. स. १४५४

**परिचय :** संत कान्होपात्रा दिसायला रूपवान होत्या. लहानपणापासूनच नृत्य, संगीत कलेची आवड. आणि त्या कलेत त्या प्रवीण झाल्या. एके दिवशी त्यांच्या समोरून वारकरी पंढरपूरला जात होते. त्यांच्या तोंडून विठ्ठलाचे वर्णन ऐकल्यावर त्या पण वारीला जाण्यास निघाल्या व तेव्हापासून त्यांना विठ्ठलभक्तीचे वेडच लागले.

**धार्मिक कार्य :** त्यांनी अनेक भजने, अभंग लिहिले. त्या विठ्ठलाची भजने गाता गाता नाचत असत. भजनात रममाण होत असत.

**सामाजिक कार्य व शिकवण :** उच्च-नीच असा भेदभाव करू नका. सर्वांना समानतेची वागणूक द्या, अशी शिकवण त्यांनी दिली.

समाजातील विषमता दूर करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. सगळ्यांनी भक्तिभावाने देवाची प्रार्थना करावी, देव एकच आहे, त्याची मनापासून प्रार्थना केली तर तो भक्तांसाठी धावून येतो, असा संदेश श्री संत कान्होपात्रा यांनी समाजाला दिला.

**इतर कार्ये :** संत कान्होपात्रा यांच्या अभंगांतून विठ्ठलभक्तीचे दर्शन घडते. संत कान्होपात्रा एका वेश्येची मुलगी. आपण अशा आहोत, म्हणून श्री विठ्ठल आपला अंगीकार करणार नाही, असे त्यांना वाटे; पण त्यांची भक्ती अनन्यसाधारण होती. त्या श्री विठ्ठलाला पूर्णपणे शरण गेल्या. श्री विठ्ठलाने त्यांना दर्शन दिले.

एके दिवशी बादशहाची माणसे त्यांना न्यावयास आली असता त्यांनी पंढरपूरच्या मंदिरात जाऊन पांडुरंगाची अंत:करणापासून प्रार्थना केली आणि ती श्री पांडुरंगाने ऐकली. त्या महान संत कान्होपात्रेला भगवंतांनी आपल्या चरणी विलीन केले.



# ९. संत श्री रोहिदास

हे उत्तर भारतातील महान संत असले तरी महाराष्ट्रातील संत नामावळ्यात त्यांचा उल्लेख आढळतो. **जन्मगाव :** काशी जवळ गोवर्धनपूर

संत रोहिदास सर्वांना परिचित असणारे महाराष्ट्रातील थोर संत.

**परिचय :** संत रोहिदास हे परम विष्णुभक्त होते. पायांतील जोडे सांधण्याचा त्यांचा व्यवसाय होता. व्यवसाय करत असताना ते श्रीविष्णूचे सतत नामस्मरण करत असत.

**धार्मिक कार्ये :** संत श्री रोहिदासांचे अनेक अभंग, भजने प्रसिद्ध आहेत. त्यांच्या भजनांत विष्णुभक्ती ओतप्रोत भरलेली दिसून येते.

**इतर कार्ये :** भक्ताचे अंत:करण निर्मळ असेल तर त्याच्यातच भगवंत राहत असतो, असे संत रोहिदास यांचे मत होते. देवाची भक्ती करताना उच्च-नीच भेद कोणीही करू नये, सर्व भक्तांसाठी देव हा समान आहे, असे त्यांचे म्हणणे होते.

**सामाजिक कार्य व शिकवण :** संत रोहिदास यांनी देवाचे सतत नामस्मरण करा, जातिभेद पाळू नका, सगळीकडे देव एकच आहे, सर्वांना समानतेची वागणूक द्या, असा संदेश समाजाला दिला.



# १०. संत श्री दामाजीपंत

महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील थोर संत म्हणून ओळखले जाणारे संत श्री दामाजीपंत एक होत.

**जन्म :** इ. स. १४५६

**परिचय :** संत श्री दामाजीपंत मंगळवेढ्याचे रहिवासी. ते बिदरच्या बादशहाच्या घरी काम करीत होते. ते मंगळवेढा गावाचे अधिकारी होते. ते सतत श्री पांडुरंगाचे नामस्मरण व भजन करीत असत.

**धार्मिक कार्य :** संत श्री दामाजीपंत यांनी रचलेली भजने, तसेच अनेक अभंगरचनासुद्धा प्रसिद्ध आहेत. त्यांच्या अभंगरचनेतून विठ्ठलाबद्दलची भक्ती, आस्था व प्रेम या गोष्टींचे दर्शन घडते.

**सामाजिक कार्य व शिकवण :** संत श्री दामाजीपंत यांना जातिभेद मान्य नव्हता. देवाला सर्व भक्त सारखेच असतात, अशी शिकवण त्यांनी समाजाला दिली. भक्तिमार्ग चळवळीतून त्यांनी अतिशय प्रभावीपणे कार्य केले. दानधर्म करा, दुसऱ्याला त्रास देऊ नका, ईश्वराचे नामस्मरण करा, देवाची मनापासून भक्ती केली तर संकटकाळी तो नक्कीच आपल्याला मदत करतो, असा संदेश त्यांनी आपल्या कार्यांमधून समाजाला दिला.

# ११. संत श्री सेना महाराज



महाराष्ट्रातील प्रसिद्ध संत म्हणून ओळखल्या जाणाऱ्यांपैकी एक संत श्री सेना महाराज होत.

**जन्मगाव :** बांधवगड **जन्मसाल :** इ. स. १३७९

**परिचय :** संत श्री सेना यांना लहानपणापासूनच परमेश्वर-भक्तीची आवड होती. ते व्यवसायाने नाभिक होते. काम करता करता ते पांडुरंगाचे भजन-कीर्तन करत. रामानंद स्वामी हे त्यांचे गुरू होत.

**धार्मिक कार्य :** संत श्री सेना यांनी रचलेली अनेक भजने प्रसिद्ध आहेत. त्यांनी मध्य भारतातील अनेक तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या. पुढे आळंदी येथे ज्ञानेश्वर माउलींच्या दर्शनाने त्यांचे देहभान हरपून गेले.

**सामाजिक कार्य व शिकवण :** घरी येणाऱ्या साधुसंतांची ते सेवा करत. त्यांच्या गुरूंच्या आदेशानुसार त्यांनी भक्तिमार्ग चळवळीत सामाजिक समता आणण्याचे कार्य केले. सामाजिक विषमता, जातिभेद-अंधश्रद्धा, अनिष्ट परंपरा व रूढींना त्यांनी कडाडून विरोध केला. सतत ईश्वराचे नामस्मरण करण्याचा संदेश त्यांनी दिला.

**इतर कार्ये :** संत श्री सेना बादशहाकडे नोकरीला असताना एक दिवस पांडुरंगाची पूजा करत असता बादशहाने त्यांना तीन-चार वेळा बोलावणे पाठवले; पण ते आले नाहीत. क्रोधित बादशहाने संत श्री सेना यांना शिक्षा देण्याचे ठरविले, तेव्हा पांडुरंगाने नाभिकाचे रूप घेऊन बादशहाची हजामत करून भक्ताची मदत केली, अशी कथा आहे.

ते पंढरपुराला आले. त्यांनी पांडुरंगाचे दर्शन घेतले. नंतर आपल्या बांधवगड या मायभूमीत आल्यावर शांत अंत:करणाने इ. स. १४४८ मध्ये ते समाधिस्थ झाले.



# १२. संत श्री नरहरी सोनार

श्री नरहरी सोनार हे महाराष्ट्रातील एक थोर संत.

**जन्मगाव :** पंढरपूर **जन्मसाल :** इ. स. १३१३

**परिचय :** श्री नरहरी सोनार हे शंकराचे परमभक्त होते. शिवभक्तीचा वारसा त्यांच्या आई -वडिलांकडूनच त्यांना मिळालेला होता. त्यांचा पिढीजात सोनाराचा व्यवसाय होता.

**धार्मिक कार्य :** संत श्री नरहरी सोनार यांनी अनेक अभंग रचना केल्या. त्यांच्या अभंगांत शिवभक्ती ओतप्रोत भरलेली आहे.

**सामाजिक कार्य व शिकवण :** श्री नरहरी सोनार हे भक्तिमार्ग चळवळीतील संत होते. देव एकच आहे, ही शिकवण त्यांनी समाजाला दिली. प्रत्येक काम ईश्वराचे आहे असे समजून नि:स्वार्थीपणे करा, हा संदेश त्यांनी समाजाला दिला. गुरूंच्या मार्गदर्शनाशिवाय कोणालाही देवापर्यंत जाता येत नाही, गुरूंनी दाखविलेल्या मार्गाचा अवलंब केला तर भक्ताचे जीवन सफल होते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

**इतर कार्य :** पंढरीत राहून कधीही ते पांडुरंगाच्या देवळात गेले नाहीत; कारण ते शिवभक्त होते. एके दिवशी एक सावकार त्यांच्या दुकानात आला. त्याने पांडुरंगाच्या कमरेचे माप घेऊन एक करदोडा तयार करण्यास सांगितले, तेव्हा नरहरी सोनारांनी डोळ्यांवर पट्टी बांधून विठ्ठलाच्या कमरेचे माप घेऊन करदोडा बनवला व सावकाराला दिला. सावकाराने पूजेच्या दिवशी करदोडा विठ्ठलाला घातला तर तो चार बोटे आखूड झाला. स्वत: नरहरी सोनार डोळ्यांवर पट्टी बांधून तो करदोडा घालण्यास देवळात गेले, तर त्यांच्या हाताला शंकराची पिंड लागली. त्यांनी डोळ्यांची पट्टी सोडली तर पांडुरंगाची मूर्ती दिसली. तेव्हा त्यांना जाणवले, की दोन्ही देव एकच आहेत. म्हणून ते म्हणत, देव एकच आहे; मनापासून भक्ती करा, म्हणजे तो आपल्याला भेटतो.

गरजेपेक्षा जास्त वस्तूंचा संचय करू नये, गोरगरिबांना मदत करा, अशी शिकवण संत श्री दामाजीपंत यांनी समाजाला दिली.

**इतर कार्ये :** संत श्री दामाजीपंत मंगळवेढ्याचे अधिकारी असताना मोठा दुष्काळ पडला. लोकांची अन्नपाण्यावाचून खूप वाईट स्थिती झाली होती. संत श्री दामाजीपंत सर्वांभूती समता धरून अन्नदान करतात, असे लोकांना समजले. लोक दामाजीपंतांकडे गेले. तेव्हा धान्यांनी भरलेली सरकारची दोन कोठारे संत दामाजीपंतांच्या ताब्यात होती. लोकांची अवस्था पाहून त्यांनी दोन्ही कोठारे लोकांना खुली करून दिली; परंतु इकडे बादशहा मात्र क्रोधीत झाला व त्याने दामाजीपंतांना पकडून आणण्याचा आदेश दिला. तेवढ्यात पंढरीच्या पांडुरंगाने संत दामाजीपंतांच्या सेवकाचे रूप घेऊन पत्र व धनाची पिशवी बादशहाच्या हाती दिली. ती पिशवी पाहून बादशहाला आश्चर्य वाटले. त्याने सेवकाला धनाची पिशवी खजिन्यात ओतण्यास सांगितले पण ती रिकामीच होत नव्हती.

अशा प्रकारे विठ्ठलाने संत श्री दामाजीपंतांची मदत केली. अशा या थोर संतांचे अभंग आजही प्रसिद्ध आहेत.

# १३. संत सावता माळी

महाराष्ट्रातील थोर संतांपैकी एक संत श्री सावता माळी.

**जन्मगाव :** अरणभेंडी (सोलापूर) **जन्म :** इ. स. १२५०

**मृत्यू :** आषाढ वद्य चतुर्दशी शके १२१७ (इ.स.१२९५)

**परिचय :** श्री सावता माळी मूळचे माळी कुटुंबातील होते. पंढरपूर येथील विठ्ठल हे त्यांचे दैवत होते. विठ्ठलभक्तीचा वारसा त्यांना त्यांच्या आईवडिलांकडूनच मिळाला होता. मळ्यात भाजीपाला पिकवणे आणि तो बाजारात नेऊन विकणे हा त्यांचा व्यवसाय होता.

**धार्मिक कार्य :** संत श्री सावता माळी यांनी अनेक अभंग रचले. त्यांनी रचलेले अभंग आजही गायले जातात. त्यांच्या अभंगांत विठ्ठलभक्ती ओतप्रोत भरलेली आहे.

**सामाजिक कार्य व शिकवण :** संत श्री सावता माळी यांनी आपले दैनंदिन जीवन जगताना भक्तिमार्गाचा अवलंब करा, असा उपदेश केला. देव हा सर्वत्र आहे, देवाला सारे समान आहेत, अशी शिकवण त्यांनी समाजाला दिली. समाजातील विषमता दूर करून त्यांनी राष्ट्रीय कार्यास हातभार लावला.



**इतर कार्ये :** संत श्री सावता माळी सकाळपासून संध्याकाळपर्यंत शेतात काम करायचे. हाताने काम व मुखाने विठ्ठलनाम असा त्यांचा दिनक्रम होता. संत श्री सावता माळी यांच्या मते, भगवंत हा अवघ्या चराचरांत म्हणजे शेतातल्या धान्यात आहे, शेतातून वाहणाऱ्या पाण्यात, वाऱ्यावर डोलणाऱ्या पानांत, इतकेच नव्हे तर घामाच्या थेंबातून पिकणाऱ्या, फुलणाऱ्या, तरारून वर येणाऱ्या कांदा, मुळा या साऱ्यांत आहे.

एके दिवशी हाती काम व मुखी विठ्ठल नाम चालू असताना स्वतः विठ्ठल धावत येऊन त्यांना म्हणाले, ''अरे सावतोबा, संतजन मला पकडून नेण्यासाठी येत आहेत, तेव्हा मला लपायला जागा दे.' असे म्हटल्यावर संत सावता माळी यांनी आपल्या छातीवर विळा चालवला व विठ्ठलाला लपावयास जागा दिली, अशी आख्यायिका आहे. किती ही निस्सीम भक्ती !



# १४. संत श्रीनिवृत्तिनाथ

**जन्म गाव** : आपेगाव

**प्रस्तावना** : आपल्या महाराष्ट्रात वारकरी संप्रदायात अनेक थोर संत होऊन गेले; त्यापैकी निवृत्तिनाथ हे एक संत होत.

**परिचय** : संत निवृत्तिनाथांचा जन्म 'आपेगाव' येथे झाला. त्यांच्या आईचे नाव रुक्मिणी व वडिलांचे नाव विठ्ठलपंत असे होते. संत ज्ञानेश्वर संत मुक्ताबाई व सोपानदेव ही त्यांची भावंडे होती.


संत निवृत्तिनाथ हे एकदा ब्रह्मनगरीला गेल्यावर त्यांना एका गुहेत श्री गहिनीनाथांचा आशीर्वाद मिळाला व त्यांनी निवृत्तिनाथांना नाथपंथाची दीक्षा दिली.

आईवडिलांच्या नंतर त्यांनी आपल्या भावंडांचा सांभाळ केला. संत श्री ज्ञानेश्वर हे संत निवृत्तिनाथांना आपल्या गुरुस्थानी मानत होते. त्या वेळी समाजातील लोकांना खऱ्या धर्माची, सत्याची ओळख करुन देण्याची गरज होती. म्हणून संत निवृत्तिनाथांनीच ज्ञानेश्वरांना समाजाचा उद्धार करण्यासाठी 'भगवद्‌गीता' हा ग्रंथ प्राकृत भाषेत लिहिण्यास सांगितले.

**धार्मिक कार्य व शिकवण :** त्यांनी अनेक अभंग लिहिले. त्यांनी शिवभक्तीबरोबरच कृष्णभक्ती करण्यास सांगितले. तसेच शिव व हरी दोन्ही एकच आहेत. 'आपल्या अभंगांतून समाजापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

"संत निवृत्तीनाथ म्हणतात कि, 'गुरुकृपा झाल्यानंतर साधकाला कांहीच अशक्य नसते. गुरूंच्या मार्गदर्शनाशिवाय कोणालाही ईश्वरप्राप्ती होत नाही. गुरूने दाखवलेला मार्ग स्वीकारला तर आपले जीवन सफल होते. देवाला सर्वजण समान आहेत. देवाची भक्ती





# १५. भगवान श्रीमद् श्रीधरस्वामी

**जन्म गाव** : चिंचोळी (मराठवाडा) **जन्म : ७ डिसें. १९०८**

**प्रस्तावना :** भगवान श्रीमद् श्रीधरस्वामी सर्वांना परिचित आहेत.

**परिचय :** भगवान श्रीमद् श्रीधरस्वामी यांच्या आईचे नाव कमळाबाई व वडिलांचे नाव नारायण असे होते. ते रामदास स्वामींचे उपासक होते. त्यांनी रामदास स्वामींच्या अनेक गोष्टी आचरणात आणल्या. दुसऱ्यांना मदत करणे व इतरांच्या सुखासाठी झटणे यातच त्यांना आनंद मिळत असे.


**धार्मिक कार्य व शिकवण :** श्रीधरस्वामी वसतिगृहात राहत असताना त्यांची इतरांना मदत करण्याची, इतर जनांची सेवा करण्याची वृत्ती पाहून त्यांना त्यांच्या गुरुजींनी सज्जनगडावर जाऊन आपले जनहित कार्य करण्यास सांगितले.

त्यानुसार त्यांनी सज्जनगडावर जाऊन पूर्ण जीवन समर्थ रामदासांच्या चरणी अर्पण केले. ते समर्थ रामदासस्वामींचे सेवेकरी बनले. तेथे त्यांनी लोकांची सेवा केली. पुढे त्यांनी दक्षिण भारतात जाऊन प्रवचने केली. अनेक ग्रंथ लिहिले.

लोकांनी सदैव सुखी रहावे, आनंदी असावे, यासाठी त्यांनी खूप कष्ट घेतले. समाजातील दुष्ट प्रवृत्तींचा नायनाट व्हावा यासाठी ते सतत झटले. धर्मप्रसारासाठी ते संपूर्ण भारतभर हिंडले.

**सामाजिक कार्य :** श्रीधरस्वामींनी सज्जनगडावर श्री. समर्थ रामदास स्वामींचा अनुग्रह घेतला. समाधिस्थळावर येणाऱ्या भाविकांची ते मनापासून सेवा करत असत. विद्यार्थिदशेत असताना ते इतर विद्यार्थ्यांना मदत करत असत. यातच त्यांना आनंद वाटत असे. आपल्याकडे येणारा प्रत्येक माणूस दुःखमुक्त व्हावा, असे त्यांना मनापासून वाटत होते. त्यांनी (समाजाचा आपल्या प्रवचनातून कोणाशीही वाईट वागू नका, दुष्ट प्रवृत्तीचा)नायनाट करा अशी शिकवण दिली.


भगवान श्रीमद्श्रीधरस्वामी यांना श्री. समर्थ रामदासस्वामींनी 'भगवान' ही पदवी दिली. अशा या महान संताने कर्नाटकमध्ये





# सरस्वती बुक कंपनीची विद्यार्थिप्रिय मालिका

## देशासाठी लढणाऱ्या, समाजासाठी झटणाऱ्या महान वीरांची, नेत्यांची सचित्र चरित्रमाला


**मराठी, इंग्रजी भाषेत उपलब्ध**
















| | | |
|---|---|---|
| स्वातंत्र्यवीर सावरकर | शहीद भगतसिंग | महाराणा प्रताप |
| डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् | शिक्षणमहर्षी जोतीबा फुले | झुंजले वीर देशासाठी |
| दलितांचे कैवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर | शांतिदूत रवींद्रनाथ टागोर | सम्राट अशोक |
| राष्ट्रपिता महात्मा गांधी | समाजसेवक नामदार गोखले | स्वातंत्र्यसेनानी नानासाहेब पेशवा |
| मुलांचे चाचा पं.जवाहरलाल नेहरू | छत्रपती शिवाजी महाराज | श्रीमंत थोरले माधवराव पेशवे |
| नेताजी सुभाषचंद्र बोस | भारतरत्न धोंडो केशव कर्वे | नाना फडणवीस |
| संग्रामदेवता झाशीची राणी | स्वामी विवेकानंद | शंभुराजे |
| पोलादी पुरुष वल्लभभाई पटेल | डॉ. राजेंद्र प्रसाद | भगवान महावीर |
| भूदान यात्रेचे वारकरी विनोबा भावे | कर्मवीर भाऊराव पाटील | आर्य चाणक्य |
| लोकमान्य टिळक | पं. लाल बहादूर शास्त्री | स्वातंत्र्याच्या वेदीवरती |












| | |
|---|---|
| पंचतंत्राच्या गोष्टी | बिरबल आणि बादशाहाच्या चातुर्यकथा |
| इसापनीतीतील बोधपर कथा | सिंदबादच्या साहसी सफरी |
| हितोपदेश | मुल्ला नसुरुद्दिन |
| सुलभ संपूर्ण महाभारत | आईच्या बोधपर गमतीदार गोष्टी |
| सुलभ संपूर्ण रामायण | आजीच्या संस्कारक्षम छान छान गोष्टी |